अनुसूचित क्षेत्रातील (पेसा) आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) या पदावर मानधनतत्वावर नियुक्ती देणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
आरोग्य विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक आरोग्य/आस्था-३/४८५/२०२५
दिनांक- ०२/०७/२०२५

**वाचा :-** १. महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.प्राणिमं १२२२/प्र.क्र.५४/ का.१३-अ, दिनांक- ०४ मे २०२२

२. महा.शासन ग्रामविकास विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २०२२/प्र.क्र.११/ आस्था ८, दिनांक- १५ मे २०२३

३. जिल्हा परिषद अहिल्यानगर अंतर्गत गट-क मधील सरळसेवेची रिक्त पदे भरण्यासाठीची जाहिरात क्रमांक ०१/२०२३

४. महा.शासन सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबईकडील शासन निर्णय क्र.बीसीसी-२०२३/प्र.क्र.५४/ आरक्षण ५, दिनांक- ०५ आक्टोबर २०२४

५. जिल्हा निवड समिती अहिल्यानगर यांचेकडील निवडयादी दि.०९/०६/२०२५

**- : आदेश :-**

जिल्हा निवड समिती/जिल्हा परिषद निवड समिती अहिल्यानगरकडून शिफारस केलेल्या खालील उमेदवारांची जिल्हा सेवा (गट-क) मानधन तत्वावर आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) या पदावर मासिक मानधन रुपये ५१५३७/- आणि नियमित आरोग्य सेवक (पुरुष) यांचेप्रमाणे प्रवासभत्ता याप्रमाणे त्यांचे नावासमोर नमुद केलेल्या ठिकाणी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मानधन तत्वावर विशेष बाब म्हणुन नियुक्ती करणेत येत आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नांव व पत्ता | निवडीचा प्रवर्ग | नियुक्ती व पदस्थापनेचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.प्रतिक मधुकर खाडे, मु.भंडारदरा, पो.शेंडी, ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन कोड नं. ४२२६०४ | अनुसुचित जमाती | उपकेंद्र पाडाळणे, प्रा.आ.केंद्र विठा, ता. अकोले |
| २ | श्री.गोगा चंदर इदे, मु.पो.मुतखेल, ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन कोड नं. ४२२६०४ | अनुसुचित जमाती | उपकेंद्र पाडाळणे, प्रा.आ.केंद्र विठा, ता. अकोले |
| ३ | श्री.गोरक्षनाथ नवनाथ बांबेरे, मु.कोडाणे, पो.रानद बु., ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन कोड नं. ४२२६०४ | अनुसुचित जमाती | उपकेंद्र एकदरे, प्रा.आ.केंद्र खिरविरे ता. अकोले |
| ४ | श्री.सागर यादव धोंगडे , मु.पो.लाडगांव, ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन कोड नं. ४२२६०४ | अनुसुचित जमाती | उपकेंद्र सावरगावपाट, प्रा.आ.केंद्र देवठाण, ता. अकोले |
| ५ | श्री.लक्ष्मण गणपत साबळे, मु.शिलवंडी, पो.कोहणे, ता.अकोले, जि.अहिल्यानगर पिन कोड नं. ४२२६१० | अनुसुचित जमाती | उपकेंद्र करंडी, प्रा.आ.केंद्र ब्राम्हणवाडा ता. अकोले |

**नेमणूकीच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१. मानधन तत्वावर दिलेली नेमणूक ही मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल असलेल्या विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ च्या अंतीम निर्णयाच्या अधीन राहुन करण्यात येत आहे.

२. सदरची मानधन तत्वावर दिलेली नेमणुक ही पुढील आदेशापर्यंत अथवा शासन निर्देशापर्यंत अथवा मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल विशेष अनुज्ञा याचिका २२१०९/२०२३ संदर्भातील निकालाच्या अधीन राहून येणा-या शासन आदेशापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यत वैध राहील.

३. आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) या पदावर मानधन तत्वावर केलेली नियुक्ती केव्हाही कोणत्याही प्रकारची आगाऊ नोटीस न देता संपुष्टात आणणेत येईल.

४. विशेष बाब म्हणुन मानधन तत्वावर नियुक्ती असुन सदरची रक्कम ही नियमित वेतन नसून मासिक मानधन आहे.

५. आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) या पदावर नियुक्ती देतांना, आपण सादर केलेलीकागदपत्रे व प्रमाणपत्रे, माहिती खोटी आढळल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता आपली नियुक्ती संपुष्टात आणण्यात येईल तसेच नियमाप्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय, शासन परिपत्रक, शासन पत्र आपणावर बंधनकारक राहील.

७. मानधनतत्वावर नियुक्ती कालावधीत आपणास एकुण १२ किरकोळ रजा अनुज्ञेय राहतील. (एकुण देय रजेपेक्षा जास्त रजा या विनावेतन असतील)

८. आपणास ज्या आरोग्य उपकेंद्रचा कार्यभार दिलेला आहे, त्या उपकेंद्राचा कार्यभार नियमानुसार सांभाळणे आपणावर बंधनकारक राहील या आशयाचे बंधपत्र तालुका आरोग्य अधिकारी पंचायत समिती कार्यालय यांचेकडे रुजु होताना देणे आवश्यक आहे.

९. मानधन तत्वावर नियुक्त करण्यात आलेल्या उमेदवारांची शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम नसल्याचे व प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता नसलेचे निदर्शनात आल्यास त्यांची सेवा कोणत्याही स्वरुपाची पुर्व सुचना अथवा नोटीस न देता सेवा समाप्त करण्यात येईल.

१०. आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) नियुक्तीपूर्वी दोन प्रतिष्ठित व्यक्तींचे जामिनपत्र लिहून द्यावे.

११. उमेदवाराने खाली दिलेल्या नमुन्यात प्रतिज्ञापत्र भरुन ज्या कार्यालयात नेमणुक करणेत आलेली आहे त्यासंबंधीत गटविकासअधिकाऱ्याकडे सादर करावे.

**प्रतिज्ञापत्राचा नमुना-मी,श्री/श्रीम** .......................रा ............ प्रतिज्ञापत्र लिहून देतो की, जिल्हा परिषदअहिल्यानगर सेवेत माझी नियुक्ती मानधन तत्वावर झाली असून ती कोणतेही कारण अथवा नोटीस न देता संपविण्याचा जिल्हा परिषदअहिल्यानगर ला पुर्ण अधिकार आहे. या बाबत मला पुर्ण कल्पना व माहिती असून मी मानधन तत्वावर आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) ही नेमणुक स्वीकारत आहे.

१२. आरोग्य सेवक पुरुष पदासाठी महाराष्ट्र शासनाच्या विभागीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र आणि सार्वजनिक आरोग्य संस्था नागपूर यांचेकडून घेण्यात येणारे अभ्यासक्रम किंवा शासनाने समकक्ष ठरविलेले इतर संस्थेतील विहीत १२ महिन्यांचे मुलभूत प्रशिक्षण पुर्ण केले नसेल त्यांनी सदर प्रशिक्षण तीन संधीत पुर्ण करणे आवश्यक राहील.

१३. मानधन तत्वावर आरोग्य सेवक (पुरुष) (५० टक्के हंगामी फवारणी व इतर मधुन) पदाच्या नेमणुकीचे आदेश मिळालेपासून ३० दिवसांचे आत नेमणुकीचे ठिकाणी रुजू व्हावे लागेल. नेमणुकीचे ठिकाणी मुदतीत रुजु न झाल्यास नेमणूक आदेश रद्द केला जाईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

सदरचा आदेश हा अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 20250702100196 असा आहे.

(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री. ----------------------------------------------------------

१. तालूका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती अकोले

२/- संबधित नियुक्त उमेदवारास नियमानुसार व वरील अटी शर्तींच्या अधीन राहून तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयात हजरकरुन घ्यावे. तत्पुर्वी संबंधितांच्या मुळकागदपत्रांची फेर पड़ताळणी आपल्यास्तरावरुन करावी. संबधीताचा हजर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत कार्यवाहीसाठी

१. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.),जिल्हापरिषदअहिल्यानगर
२. मुख्यलेखाववित्तअधिकारी,जिल्हापरिषदअहिल्यानगर

प्रत माहितीसाठी सविनय सादर-

मा.अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी अहिल्यानगर

(आनंद भंडारी,भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर